महासागर गोंदिया
पान ३
बुधवार, दि.११ जून २०२५

## कत्तलीसाठी जाणारे जनावरे पकडले

**प्रतिनिधी / तिरोडा**

कत्तलीसाठी जनावरे वाहतूक करीत असलेला पीक तिरोडा पोलिसांनी पकडला. ही कारवाई ६ जूनच्या मध्यरात्री दरम्यानची आहे. या प्रकरणी पोलिसांनी जनावरांची सुटका करून ४ लाख १७ हजाराचा मुद्देमाल जप्त केला आहे.

सविस्तर असे की, तिरोडा पोलिसांचे पथक रात्र गस्तीवर होते. मध्यरात्रीदरम्यान पीक वाहन क्र.एमएच-४२/एक्यु-३८३६ दिसून आले. वाहनाला अडवून तपासणी केली असता पाच जनावरे कोंबून वाहतूक करीत असल्याचे समोर आले. यावरून वाहन चालक व मालक मनीष अनंतलाल लिल्हारे व मोरेश्वर काशीनाथ बिसेन यांना जनावर वाहतुकीचा परवाना विचारला असता त्याने कोणत्याही प्रकारचा परवाना नसल्याने सांगितले.

तसेच जनावर मालकी हक्काबाबत उडवाउडवीची व संशयास्पद उत्तर देत असल्याने पोलिसांनी वाहन ताब्यात घेवून जनावरांची सुटका केली. या प्रकरणी वाहनासह पाच जनावरे असे एकूण किंमत ४ लाख १७ हजार रूपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे. दोन्ही आरोपीविरूध्द तिरोडा पोलिस ठाण्यात कलम ११(१) (ड) प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम १९६० सहकलम ५.६.९ महा. पशु. संवर्धन अधियिम १९७६ अन्वये दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोहवा ब्रिजेश मडावी करीत आहेत.

महासागर
जिल्हा कार्यालय, गोंदिया
जिल्हा प्रतिनिधी
जयंत शुक्ला
पत्ता : दुसरा माळा, गौरक्षण मार्केट, गांधी प्रतीमा चौक, गोंदिया
संपर्क क्र ९८२२३८६९९९

# राजकारणा सोबतच समाजकारण हाच राष्ट्रवादी काँग्रेसचा उद्देश : राजेंद्र जैन

## राष्ट्रवादी काँग्रेस भवन गोंदिया येथे पक्षाचा २६ वा वर्धापन दिन मोठया थाटात संपन्न

**प्रतिनिधी / गोंदिया**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण या धोरणावर काम करतो. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार, खासदार प्रफुल पटेल यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन काम करणारा पक्ष आहे. कितीही कठीण प्रसंग आले तरी जनता, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आदरणीय साहेबांच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहली त्यामुळेच आज पक्षाचा वर्धापन दिन मोठ्या थाटात साजरा करीत आहोत. पक्षाचा २६ वा वर्धापन दिन साजरा करतांना जास्तीत जास्त सभासद नोंदणी करून बूथ स्तरावर संघटन मजबूत करण्याचा सर्वांनी प्रण घ्यावा असे प्रतिपादन माजी आमदार राजेंद्र जैन यांनी केले.




आज राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या २४ व्या वर्धापन दिनानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस भवन रेलटोली गोंदिया येथे ध्वजारोहण कार्यक्रम माजी आमदार राजेंद्र जैन, जिल्हाध्यक्ष प्रेमकुमार रहांगडाले यांच्या प्रमुख उपस्थितीत साजरा करण्यात आला.

राजेंद्र जैन, प्रेमकुमार रहांगडाले, देवेंद्रनाथ चौबे, विनोद हरिणखेडे, प्रभाकर दोनोडे, राजलक्ष्मी तुरकर, डॉ अविनाश जायस्वाल, डॉ योगेंद्र भगत, मोहनलाल पटले, बाळकृष्ण पटले, राजू एन जैन, किरणकुमार पारधी, जगदीश बावनथडे, नानू मुदलियार, माधुरी नासरे, प्रियाताई हरिणखेडे, डॉ अजय उमाटे, कीर्ती पटले, कुंदा दोनोडे, पुस्तकला माने, सोनाली ब्राह्मणकर, रुचिता चौहान, गीता हरिणखेडे, मोनिका सोनवाने, बैस, अशोक सहारे, सतीश देशमुख, डॉ मृत्युंजय सिंग, विनोद पंधरे, विनीत सहारे, खालिद पठाण, भगत ठकरानी, अनुज जायस्वाल, निरज उपवंशी, शंकरलाल टेम्भरे, निशिकांत बन्सोड, बिसराम चर्जे, नितीन टेम्भरे, करण टेकाम, अशोकसिह गौतम, प्रवीण बैस, वेनेश्वर पंचबुद्धे, राजेश दवे, हरबक्ष गुरुनानी, विनायक शर्मा, राजेश तुरकर, राजेश वर्मा, सुनील पटले, शैलेश वासनिक, राजकुमार ठाकरे, एकनाथ वहिले, आर डी अग्रवाल, राकेश वर्मा, खुशाल कटरे, लीकेश चिखलोंडे, अशोक गिरी, रमण उके, रवी रामटेक्कर, झनकलाल ढेकवार, लव माटे, सुरेश पटले, चंद्रपाल पटले, बाजीराव तरोणे, संतोष नागपुरे, ब्रजभूषण बैस, डॉ हिरालाल साठवणे, हर्षवर्धन मेश्राम, कपिल बावनथडे, राकेश ब्राह्मणकर, सचिन अवस्थी, दीपक कनोजे, संजू शर्मा, प्रशांत सोनपुरे, राजकुमार तायवाडे, आरिफ पठाण, अनिल खरोले,अनिल मेश्राम, दिलीप डोंगरे, योगेश दर्वे, अशोक चुटे, प्रदीप लांजेवार, कुणाल बावनथडे, संजीव बापट, श्रेयश खोब्रागडे, शरभ मिश्रा, संदेश चौरे, मंगेश रंगारी, प्रतीक पारधी, रौनक ठाकूर, रेखलाल पारधी, खुशाल बोपचे, योगेंद्र जैतवार, दुर्गाप्रसाद वंजारी, लीलाधर ठाकरे, वामन गेडाम, चिराग बावनथडे सहित मोठ्या संख्येने पक्ष पदाधिकारी व कार्यकर्ता उपस्थित होते.

## दृष्टिक्षेप

### जमिनीच्या वादावरून मारहाण

आमगाव : तालुक्यातील सुपलीपार येथे चौकात बसलेल्या अनिल धनीराम वाढई (३८) या युवकाला जमिनीच्या वादावरून उभारीने मारून जखमी केले. ही घटना ३ जूनच्या दुपारी २ वाजता सुमारासची आहे. कैलाश ठुन्नीलाल रहिले (३०) रा. सुपलीपार असे आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी आमगाव पोलिसात गुन्हा नोंद करण्यात आला. जखमी अनिल वर रुग्णालयात उपचार सुरू आहे.

### ध्वनी प्रदूषण प्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल

**अर्जुनी/मोर** : जिल्हाधिकारी यांच्या आदेशाचे उल्लंघन करून डीजे स्पीकरण वाजवून ध्वनी प्रदूषण करीत असलेल्या दोघांविरुद्ध अर्जुनी मोरगाव पोलिसांकडून फौजदारी कारवाई करण्यात आली. ही कारवाई ७ जूनच्या रात्री १०.२० वाजताच्या सुमारास करण्यात आली. बलदेवसिंग टाक (२५), अनुराग विश्वानाथ आंबेडारे (२१) दोन्ही रा. अर्जुनी मोरगाव असे आरोपींची नावे आहेत. जिल्हाधिकारी यांचे मनाई आदेश असतांनाही ठराविक वेळेवर डीजे स्पीकर वाजविणे बंद करण्यात आले नाही. दरम्यान सार्वजनिक कार्यक्रम पार पाडत असतांना आरोपींनी इच्छा पुर्वक अटकाव करून नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण केल्याच्या आरोपाखाली दोन्ही आरोपींविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पो.हवा. गोंडाने करीत आहेत. पुढील तपास आमगाव पोलिस करीत आहेत.

### प्रत्येक जिल्ह्यात तयार होणार कृषी मॉल

**गोंदिया** : राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात दक्षिण सोलापूर तालुक्याप्रमाणे कृषी मॉल उभारण्यासाठी सार्वजनिक-खासगी भागीदारी या धोरणावर आधारित धोरण तयार करावे. जेणेकरून कृषीच्या सर्व वस्तू शेतकऱ्यांना एकाच ठिकाणी उपलब्ध होतील आणि कृषी माल देखील याच ठिकाणी विक्री होणार आहे. एकंदरीत कृषी मॉल तयार करण्यासाठी राज्य शासनाच्या कृषी विभागाने हिरवा कंदील दाखविला आहे. मॉलमुळे शेतकऱ्यांना नवीन बाजारपेठ उपलब्ध होईल व शहरातील नागरिकांना, शेतकऱ्यांना उत्पादित केलेला भाजीपाला, फळे, तृणधान्य, कडधान्य व इतर कृषी आधारित उत्पादने थेट व माफक दरात खरेदी करता येतील. याच धर्तीवर राज्यात देखील कृषी विभागाकडे उपलब्ध असलेल्या जमिनीवर प्रत्येक जिल्ह्यात कृषी मॉल उभारल्यास शेतकऱ्यांना याचा फायदा होईल. त्यांचा वेळ वाचून त्यांना सर्व कृषी माल विक्री व कृषीसाठी लागणाऱ्या सर्व सहसाहित्य एकाच ठिकाणी उपलब्ध होईल. 'एक पीक एक गाव' ही संकल्पना देखील विकसित करण्यासाठी विचाराधीन आहे.

### पाण्याच्या पाईप लाईनचे भूमिपूजन

**गोंदिया** : शहरातील प्रभाग क्र. १ येथे मागील नागरिकांनी अनेक दिवसांपासून पाण्याच्या टंचाईचा सामना करावा लागत होता. दरम्यान परिसरातील नागरिकांनी, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर अध्यक्ष नानु मुदलीयार यांच्या पाठपुराव्यामुळे प्रभाग क्र. १ येथे पाण्याच्या पाईप लाईनचे भूमिपूजन करण्यात आले. सविस्तर असे की, शहरात अनेक प्रभागातील नागरिकांना पाण्याच्या टंचाईला समार जावे लागत आहे. त्यातच प्रभाग क्र. १ येथे पिण्याची भिषण टंचाई निर्माण झाल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. दरम्यान सामाजिक कार्यकर्ता पुस्तकला माने यांनी प्रभागातील पाण्याच्या समस्या सोडविण्यात यावी, अशी मागणी केली.

## शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी

**प्रतिनिधी / गोंदिया**

ग्रामीण पोलिस ठाण्यांतर्गत पांढराबोडी येथे शिवीगाळ करून मारहाण केले तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना २ जून रोजीची आहे. फिर्यादी विशाल दमाहे यांचा आरोपी राहुल दमाहे यांच्या सोबत शेती वरून वाद होता. या वादातूनच आरोपी राहुल दमाहे याने फिर्यादी विशाल दमाहे याला काठीने मारून जखमी केले.

## एम.मुरुगानंथम यांची बीड जि.प.च्या सीईओपदी बदली

**गोंदिया** : गोंदिया जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी एम.मुरुगांनथम यांची प्रशासकीय बदली सामान्य प्रशासन विभागाने केली असून त्यांना बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर नेमणूक देण्यात आली आहे.तर बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जिवने यांची बदली महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी छत्रपती सभांजीनगरच्या सह व्यवस्थापकीय संचालक पदावर करण्यात आली आहे.



एम.मुरुगांनथम यांनी गोंदिया जिल्हा परिषदेत रुजु होताच कर्मचारी व अधिकारी यांची दररोज ऑनलाईन कार्यशाळा घेण्याचा सपाटा लावलेला होता.यामुळे कर्मचारी कामात कमी व ऑनलाईन बैठकीतच अधिक व्यस्त राहयाचे.त्यामुळेच की काय यांच्या कार्यकाळात जिल्हा परिषद मुख्यमंत्र्याच्या १०० दिवसीय कार्यक्रमात पहिल्या व दुसर्या टप्यात कुठेही दिसून आली नाही.तर ई ऑफिस सुरु केल्यानंतरही काही विभागातील कर्मचारी यांचे तक्रार चौकशी प्रकरणात ई ऑफिस मार्फेत पत्र आलेले नसतानाही सरळपध्दतीने त्यांचे हित जोपासण्याचे काम केल्याचे बघावयास मिळाले.मात्र त्यांच्यापासून काही कर्मचार्यांना चांगलेही शिकायला मिळाले. आरोग्य विभागातील चतुर्थ श्रेणी महिला कर्मचार्यांना शुल्लक कारणाकरीता निलबिंत करतांना मात्र सामान्य प्रशासन व आरोग्य विभागातीलच काही कर्मचारी कापड व वजन कमी करण्याचे साहित्यांची विक्री करणार्यांना सवलत दिल्याचे चित्र बघावयास मिळाले होते.

## ६० मोबाईल मुळ मालकांना परत



**प्रतिनिधी / आमगाव**

विविध ठिकाणाहून मोबाईल हलविल्याची तक्रार आमगाव पोलिसांत दाखल करण्यात आली. तक्रारीची दखल खेत पोलिसांनी शोध मोहिम राबवित सेंट्रल इक्विपमेंट आयडेंटिटी रजिस्टर पोर्टलवर अर्ज सादर करून, आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने मोबाईलचा शोध घेतला. या माध्यमातून तब्बल ८ लाख ५३ हजार ७०० रुपये किंमतीचे मोबाईल शोधून काढण्यात पोलिसांना यश आले. दरम्यान हरवलेले ६० मोबाईल मूळ मालकांना परत देण्यात आले आहेत.

आमगाव पोलिस ठाण्यांतर्गत विविध ठिकाणाहून मोबाईल हलविल्याची ६० तक्रारी दाखल करण्यात आल्या. मोबाईलचा शोध घेण्यासाठी पोलिस निरिक्षक तिरुपती राणे यांच्या नेतृत्वात पोलिसांनी पथक तयार करून शोधचक्र फिरविला. तसेच सेंट्रल इक्विपमेंट आयडेंटिटी रजिस्टर पोर्टलच्या माध्यमातून हरवलेल्या मोईलचा शोध घेण्यात यश आले. दरम्यान मोबाईल मालकांशी संपर्क साधून त्यांना मोबाईल परत करण्यात आले. ही कारवाई जिल्हा पोलिस अधीक्षक गोरख भामरे, अप्पर पोलिस अधीक्षक नित्यानंद झा, उपविभागीय पोलिस अधिकारी प्रमोद मडामे यांच्या मार्गदर्शनात पोनि. राणे यांच्या नेतृत्वात पो.हवा. लिखीराम दसरे, असीम मन्यार, दूधराम मेश्राम, चेतन शेंडे, विनोद उपराडे, नितीन चोपकर, भागवत कोडापे, दिनेश वानखेडे, विक्रांत सलामे, सायबर सेलचे अधिकारी संजय मारवाडे, योगेश राहिले, रोशन येरणे यांनी केली. उल्लेखनीय असे की, पोलिसांची ही सेवा आणि तत्परता समाजामध्ये विश्वास निर्माण करणारी ठरली आहे.

## आश्वासनानंतर त्या ग्राम पंचायत सदस्याचे उपोषण मागे

### १५ जूनपर्यंत चौकशी करण्याची मागणी

**प्रतिनिधी / गोरेगाव**

तालुक्यातील कुऱ्हाडी ग्रामपंचायत प्रशासनाकडून विविध योजना व लिखाशिर्षकांतर्गत करण्यात आलेल्या विविध कामात मोठा भ्रष्टाचार झाला आहे, असा आरोप ग्रा.पं.सदस्य राजकुमार गौतम यांनी केला. या प्रकरणाची चौकशी करून कारवाई करण्यात यावी, या मागणीला घेवून गौतम ६ जूनपासून उपोषणला वर बसला होता.

दरम्यान ९ जून रोजी पं.स. सभापती चित्रलेखा चौधरी, गट विकास अधिकारी महेश गौतम यांनी उपोषणकर्त्याची भेट घेतली तसेच चौकशी करून कारवाई करण्याचे आश्वासन दिले. यामुळे ग्रा.प.सदस्य गौतम यांनी उपोषण मागे घेतले आहे. १५ जूनपर्यंत चौकशी झाली नाही तर १६ तारखेपासून पुन्हा उपोषण करू, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

सविस्तर असे की, पंधराव्या वित्त आयोग, ठक्करबाबा योजना, रस्ते, गटार आणि गटार बांधकाम कामांमध्ये अनियमितता आणि भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप करीत सरपंच अनिल मालवी आणि ग्रामविकास अधिकारी शिवानंद गौतम यांच्यावर कागदपत्रांमध्ये छेडछाड आणि अनैतिक कामकाजाचा आरोप केला होता आणि सर्व कागदपत्रांची घटनास्थळी चौकशी आणि पारदर्शक चौकशी करण्याची मागणीला घेवून ग्रा.पं.सदस्य राजकुमार गौतम यांनी ६ जूनपासून उपोषणाला सुरुवात केली. यासंदर्भात त्यांनी पंचायत समिती, तहसील, जिल्हा परिषद आणि जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदनही सादर केले. परंतु कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने ते आमरण उपोषणाला बसले. चौथ्या दिवशी प्रशासनाशी झालेल्या चचेर्नंतर ९ जून रोजी पं.स. सभापती चित्रलेखा चौधरी, जि.प.सदस्य शैलेश नंदेश्वर आणि गट विकास अधिकारी महेश गौतम यांच्या विनंतीवरून गौतम यांनी उपोषण तात्पुरते मागे घेतले. तसेच १५ जूनपर्यंत सर्व बिले, निविदा, जीएसटी आणि अंदाजपत्रकांची घटनास्थळी चौकशी करून चौकशी केली जाईल असे आश्वासन देण्यात आले. दोषींवर कारवाई करण्याचे आश्वासनही देण्यात आले. तसेच मागणी मान्य न झाल्यास येत्या १६ जून पासून पुन्हा उपोषणाला सुरुवात करण्यात येणार, असा इशाराही राजकुमार गौतम यांनी दिला. यावेळी पं.स.सभापती चित्रलेखा चौधरी, माजी सभापती विजय रामे, वैद्यकीय अधिकारी डॉ. किर्ती चुलपर, माजी सरपंच संजय आमडे, उपसरपंच यशवंत कवडे, ग्रामसेवक शिवानंद गौतम व मोठ्या संख्येने गावकरी उपस्थित होते.



## स्मार्ट मीटरविरुद्ध आमगावकरांचा आक्रोश

### ग्राहक पंचायतचे उपअभियंत्यांना निवेदन

**प्रतिनिधी / आमगाव**

विजेचे सध्याचे मीटर बदलून स्मार्ट प्रिपेड मीटर लावण्यात येणार आहे. हे मिटर एखाद्या मोबाईल प्रमाणे कार्य करणार आहे. रिजार्च संपला की मोबाईलची सेवा बंद होईल. याचा ग्राहकांना मनस्पात होईल. तसेच काही खासगी कंपन्यांना याचा फायदा होईल. त्यामुळे स्मार्ट प्रिपेड मीटर लावण्याच्या विरोधात अखिल भारतीय ग्राहक पंचायत, आमगाव च्या वतीने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे उपविभागीय अभियंता भांडारकर यांना निवेदन सादर करून सध्या सुरू असलेली पोस्टपेड मीटर प्रणाली सुरळीत व योग्य असून, तीच कायम ठेवावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

ग्रामीण व निमशहरी भागात स्मार्ट मीटरमुळे विजेच्या बिलांचे नियमन, प्रीपेड यंत्रणा आणि ग्राहकांचे नियंत्रण हरपण्याचा धोका असल्याने या योजनेला व्यापक विरोध होत आहे. ग्राहक पंचायतने लोकशाही मार्गाने लोकभावना प्रशासनापर्यंत पोहोचवून, ग्राहकांच्या हितासाठी भक्कम भूमिका घेतली आहे. ग्राहकांच्या संमतीशिवाय कोणत्याही घरात स्मार्ट किंवा प्रीपेड मीटर लावणे गैरकायदेशीर व अन्यायकारक आहे, असे मत व्यक्त करत ग्राहक पंचायतीने तीव्र नाराजी व्यक्त केली. तसेच स्मार्ट मीटर सक्तीने बसवू नये, सध्याची पोस्टपेड व्यवस्था कायम ठेवावी, घरमालकांच्या लिखित संमतीशिवाय मीटर बसलू नये, मागण्यांना घेवून ग्राहकांच्या हक्कांची लढाई असून, आमगाव परिसरातील जनतेचा आवाज प्रशासनापर्यंत पोहोचवण्यासाठी अखिल भारतीय ग्राहक पंचायत आक्रमक भूमिका घेणार, अशी इशाराही निवेदनाच्या माध्यमातून देण्यात आले. दरम्यान या संदर्भात झालेल्या चर्चेदरम्यान, उपविभागीय अभियंता भांडारकर यांनी, 'घरमालकाच्या स्पष्ट संमतीशिवाय मीटर लावले जाणार नाही,' असे आश्वासन दिले. या वेळी अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे अध्यक्ष प्राचार्य व्ही. डी. मेश्राम, संघटन मंत्री जगदीश शर्मा, उपाध्यक्ष बी. एम. कटरे, संतोष पुंडकर, नरेंद्र बहेटवार, रमेश लिल्लारे हे विशेषतः उपस्थित होते.



## राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा २६ वा वर्धापन दिन थाटात संपन्न

**प्रतिनिधी / तिरोडा**

सोमवार १० जून रोजी सकाळी १० वाजता शहरातील जनसंपर्क कार्यालयात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाचा २६ वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा गांधी, महान क्रांतिकारी भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमांना माल्यार्पण व अभिवादन करून करण्यात आली. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ध्वजारोहण करून उपस्थित कार्यकर्त्यांनी जयघोष केला.



यावेळी प्रदेश सरचिटणीस सौ मेघा बिसेन, शहर अध्यक्ष रविंद्रकुमार वंजारी, तालुका कार्याध्यक्ष नासिर घाणीवाला, तालुका अध्यक्ष युवराज शहारे (सामाजिक न्याय), महिला अध्यक्ष भाग्यश्रीताई केळवतकर, ओबीसी सेल अध्यक्ष खेमराज पटले, युवक अध्यक्ष रविकुमार कुर्वे, विजय बुद्धे, सरपंच रवींद्र भगत, सरपंच सौ. छायाताई टेकाम, उपसरपंच विनोद उईके, शहर युवक अध्यक्ष टिपू सैय्यद, अल्पसंख्यांक तालुका अध्यक्ष जॉनी सैय्यद, ममता ठाकरे, दिलेंद्र बिसेन, रणजित नागपुरे, मंगेश गेडाम, संजय टेंभरे, केतन रामटेके, सरपंच सौ. मंदाताई टेंभर, निरज गजभिये आदींसह प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## नवीन शैक्षणिक वर्षात शाळा सकाळपाळीत

### सकाळी ९ ते ४ वाजेपर्यंत भरणार शाळा

**प्रतिनिधी / गोंदिया**

महाराष्ट्र राज्य बोर्डाच्या शाळांचे नवीन शैक्षणिक वर्ष १६ जूनपासून सुरू होणार आहे.तर विदभार्तील जिल्ह्यांमधील शाळा २३ जून पासून सुरू होणार आहे. मात्र विदभार्तील शाळा या सुरुवातीला सकाळ-सत्रामध्ये भरवल्या जातील आणि त्यानंतर या शाळा नियमित भरतील. यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून राज्यातील शाळा सकाळी नऊ वाजे सुरु होतील आणि सायंकाळी चार वाजेपर्यंत सुरू राहतील.

राज्यातील शाळा आता सकाळी नऊ ते सायंकाळी चार पर्यंत राहतील.शैक्षणिक वर्ष २०२५ २६ पासून सकाळी नऊ वाजेपासून ते ९:२५ पर्यंत परिपाठ राहील. ९:२५ पासून ते ११:२५ पर्यंत सुरुवातीचे तीन लेक्चर्स होतील. ११:२५ ते ११:३५ पर्यंत दहा मिनिटांची लहान सुट्टी राहील. ११: ३५ ते १२:५० पर्यंत दोन तासिका होतील.१२:५० ते दीड वाजेपर्यंत मोठी सुट्टी राहील. दीड वाजेपासून ते तीन वाजून ५५ मिनिटांपर्यंत उर्वरित तासिका घेतल्या जाणार आहेत आणि शेवटचा पाच मिनिटात वंदे मातरम होईल आणि शाळा सुटणार आहे. सदरचे वेळापत्रक येत्या शैक्षणिक वर्षांपासून अमलात आणले जाईल अशी माहिती समोर येत आहे. प्रत्येत वर्षी नवीन शैक्षणिक वषार्ला जून महिन्याच्या पंधरवाड्यानंतरही सुरुवात होते. विशेष म्हणजे तापमानाची परिस्थिती बघून राज्य शासनाच्या शिक्षण विभागाच्या वतीने शाळा सुरू करण्याचा निर्णय घेण्यात येतो. विदर्भात शाळा २० जूननंतर सुरू होतात. शालेय शिक्षण विभागाच्या वतीने जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना गणवेश व पाठ्यपुस्तके मोफत दिली जातात. मात्र यंदाच्या नवीन शैक्षणिक सत्रात शाळा सकाळी ९ वाजेपासून सुरू करण्याच्या निर्णयाला आळकाठी येण्याची अधिक शक्यता आहे.



## श्रीमती मिनू पीएम गोंदिया जि.प.च्या नव्या सीईओ

**प्रतिनिधी / गोंदिया**

राज्य सरकारच्या सामान्य प्रशासन विभागाने आज दि.१० रोजी आयएएस अधिकाऱ्यांच्या केलेल्या बदल्यामध्ये गोंदिया जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर अमरावती विभागातील भातुकली-तिवसा उपविभागीय अधिकारी कार्यालयात कार्यरत सहा. जिल्हाधिकारी मिनू पीएम.यांची नियुक्ती केली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून त्यांची ही पहिलीच पदस्थापना आहे.



मिनू या केरल राज्यातील करियावोटम येथील रहिवासी असून २०२१ मध्ये केंद्रीय लोकसेवा आयोगाची परिक्षा उत्तीर्ण करुन भारतात १५० वा क्रमांक पटकावला. आयएएसची तयारी करण्याआधी त्या केरल राज्यात पोलीस क्लर्कच्या नोकरीवर कार्यरत होत्या.आपल्या स्व.वडीलांच्या इच्छेखातर नोकरी करीत असतानांच त्यांनी आयएएसची तयारी सुरु केली. मिनू पीएम या वडीलांच्या मृत्युनंतर अनुंकपावर २०१२ मध्ये पोलीस मुख्यालयात क्लर्क पदावर नोकरीला लागलेल्या होत्या.२०१५ पासूनच मिनू पीएम यांनी केंद्रिय लोकसेवा आयोगाच्या परिक्षेच्या तयारीला सुरवात केली होती.त्यानंतर २ वर्षांनीच त्यांनी परीक्षा उत्तीर्ण केली,मात्र मुलाखतीमध्ये १३ अंकांनी मागे राहिल्या.त्यानंतरही त्यांनी आपले प्रयत्न सातत्याने सुरु ठेवले होते.

# पाणी गुणवत्ता प्रयोगशाळेला भेट द्या

**गोंदिया :** पाणी हे जीवन आहे. शुद्ध पाण्यावर प्रत्येक व्यक्तीचा हक्क आहे. मात्र, आपण प्राशन करतो ते पाणी शुद्ध करण्याच्या पद्धती कशा आहेत, यांची माहिती जाणून घेण्यासाठी, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणेच्या अधिनस्थ असलेल्या जिल्हा व उपविभागीय प्रयोगशाळा या सर्व सामान्य व्यक्तींना पाहणी करण्यासाठी खुल्या करण्यात आल्या आहेत. या प्रयोगशाळांना नागरिकांनी भेट द्यावी, असे आवाहन पाणी व स्वच्छता विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी फरेंद्र कुतीरकर यांनी केले आहे.

सोमवारी (दि. १) जागतिक ॲक्रेडिएशन दिन साजरा करण्यात येत आहे. त्यानिमित्ताने भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणेच्यावतीने या प्रयोगशाळा सामान्य नागरिकांना भेट देण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. भेटीमध्ये कमीत कमी एक शाळा अथवा महाविद्यालय विद्यार्थी वर्ग कमीत कमी १० संख्येमध्ये अथवा सरकारी कार्यालयातील कर्मचारीवृंद कमीत कमी १० संख्येमध्ये प्रयोगशाळा पाहणी करू शकतील. भेटीत प्रयोगशाळेत तपासणी करण्यात येणारे रासायनिक व जैविक घटक, तपासणी करतांना आवश्यक असणारी संयंत्रे, उपकरणे, ॲक्रिडियेशन प्रक्रियेची माहिती, एन.ए. बी. एल. प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर प्रयोगशाळेतील पाणी नमुने तपासणीमध्ये येणारी सुसूत्रता इत्यादीबाबत माहिती देण्यात येणार आहे.. दरम्यान शाळा व महाविद्यालयीन विद्यार्थी, सरकारी कार्यालयातील कर्मचारीवृंद, सर्वसामान्य नागरीकांना प्रयोगशाळेतून मिळणारी माहीती उपयुक्त असून नागरीकांनी प्रयोगशाळेला भेट देण्याचे आवाहन जलजीवन मिशनचे प्रकल्प संचालक कुतिरकर यांनी केले आहे.

# आधी बोनस, आता चुकाऱ्याने शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी!

## १४१ कोटी रुपयांचे चुकारे थकले : १३ हजारांवर शेतकरी अडचणीत

**गोंदिया :** रब्बी हंगामात जिल्हा मार्केटिंग फेडरेशनच्या शासकीय धान खरेदी केंद्रावर नोंदणी केलेल्या १३ हजार २०९ शेतकऱ्यांनी ६ लाख १३ हजार क्विंटल धानाची विक्री केली; पण या शेतकऱ्यांचे १४१ कोटी २० लाख रुपयांचे चुकारे गेल्या महिनाभरापासून निधीअभावी थकले आहेत. आधी बोनसची रक्कम आणि आता चुकारे मिळण्यास विलंब होत असल्याने खरीप हंगामात शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी झाली आहे. त्यामुळे चुकाऱ्यांसाठी शासन केव्हा निधी उपलब्ध करुन देते, याकडे आता शेतकऱ्यांच्या नजरा लागल्या आहेत.

जिल्ह्यातील शेतकरी खरीप आणि रब्बी अशा दोन्ही हंगामात धानाची लागवड करतात. रब्बीतील धानाची विक्री करून शेतकरी खरिपाची तयारी आणि उधार उसनवारी फेडून वर्षभराचे नियोजन करीत असतात. त्यामुळे रब्बी हंगाम शेतकऱ्यांसाठी महत्त्वपूर्ण आहे. रब्बी हंगामातसुद्धा शेतकऱ्यांना हमीभावापेक्षा कमी दर मिळू नये यासाठी हमीभावाने जिल्हा मार्केटिंग फेडरेशन आणि आदिवासी विकास महामंडळाच्या माध्यमातून शासकीय धान खरेदी केंद्रावरून धान खरेदी केली जात आहे. सध्या रब्बी हंगामातील धानाची कापणी व मळणीची कामे अंतिम टप्प्यात असून, शेतकरी मळणी केलेले धान शासकीय धान खरेदी केंद्रावर विक्री करण्यासाठी आणत असल्याचे चित्र आहे.

शासकीय धान खरेदी केंद्रावर धानाची विक्री करण्यासाठी शेतकऱ्यांना ऑनलाइन नोंदणी करणे अनिवार्य आहे. त्यासाठी जिल्ह्यातील ४९१०८ शेतकऱ्यांनी नोंदणी केली असून, त्यापैकी १३ हजार २०९ शेतकऱ्यांनी ६ लाख १३ हजार क्विंटल धानाची विक्री केली आहे, तर नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांपैकी ३५८९९ शेतकरी धान विक्री करण्याच्या प्रतीक्षेत आहेत. धानाची विक्री केल्यानंतर लवकरच चुकारे मिळतील आणि आपल्याला खरिपाची तयारी आणि इतर कामे करता येतील, असे नियोजन शेतकऱ्यांनी केली होते; पण चुकारे थकल्याने शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी झाली आहे. शासनाने शुक्रवारी बोनससाठी निधी उपलब्ध करून दिला, आता थकीत चुकाऱ्यांसाठी निधी कधी उपलब्ध करून देते याकडे शेतकऱ्यांच्या नजरा लागल्या आहेत.



### १५ जूनपर्यंत करता येणार नोंदणी

**शासकीय धान खरेदी केंद्रावर हमीभावाने धानाची विक्री करण्यासाठी ऑनलाइन नोंदणी करणे अनिवार्य आहे. यासाठी १५ जूनपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. शेतकऱ्यांनी निर्धारित कालावधीत नोंदणी करावी, असे जिल्हा मार्केटिंग फेडरेशनने कळविले आहे.**

# पौर्णिमेच्या चंद्राला दरमहा मिळते वेगळे नाव

## ११ जूनला दिसणार 'स्ट्रॉबेरी मून': खगोलशास्त्रातील नाव



**गोंदिया :** जून महिन्यातील शेवटची पौणिमा ११ जूनला आहे व ही पोर्णिमा खगोलशास्त्रात 'स्ट्रॅबेरी मून' म्हणून ओळखल्या जाते. वर्षात १२ महिन्यातील पौणिमेला खगोलशास्त्रात विशिष्ट नावे दिलेली आहेत. ईशान्य अमेरिकेत जूनमध्ये पिकणाऱ्या स्ट्रॅबेरी फळावरून चंद्राला हे नाव देण्यात आल्याचे खगोल अभ्यासकांनी सांगितले.

स्ट्रॅबेरी लालसर, गुलाबी रंगाच्या आणि आकाराने गोलाकार असतात. परंतु स्ट्रॅबेरी मून नावाच्या उत्पत्तीच्या चंद्राचा रंग किंवा स्वरूपाशी काही संबंध नाही, चंद्र सामान्यपणे क्षितिजाच्या जवळ असताना लालसर दिसतो. कारण प्रकाश किरणांना वातावरणाच्या सर्वात दाट थरामधून जावे लागते ११ ला रात्री चंद्र दिसेल तो सामान्य पौणिमेच्या चंद्रासारखाच राहील. त्या चंद्रामध्ये स्ट्रॅबेरीसारखा रंग दिसणार नाही. फक्त या चंद्राला खगोलशास्त्रात स्ट्रॅबेरी मून म्हणत असल्याचे हौशी खगोल अभ्यासकांकडून सांगितले जाते.

### प्रत्येक पौर्णिमेच्या चंद्राची नावे वेगवेगळी

पारंपरिक खगोलशास्त्राप्रमाणे वर्षातील १२ पौर्णिमेला विशिष्ट नावे देण्यात आलेली आहे. यामध्ये वुल्फमून-जानेवारी, ममून-फेब्रुवारी, वर्ममून-मार्च, गुलाबी चंद्र-एप्रिल, फ्लॉवर मून-मे, स्ट्रॉबेरी मून जून, बक मून-जुलै, स्टर्जन मून-ऑगस्ट, कापणीचा चंद्र-सप्टेबर-ऑक्टोबर, बिव्हर मून, नोव्हेंबर व कोल्ड मून डिसेंबर, अशी ही चंद्रांची नावे आहेत.

# गटशिक्षणाधिकाऱ्यांनी साधला विद्यार्थ्यांशी संवाद



**गोंदिया :** तिरोडा तालुक्यातील ग्राम सुकळी येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत सुरू असलेले उन्हाळी शिबीर तसेच नवोदय वर्ग, शिष्यवृत्ती पूर्व तयारी वर्गाला बुधवारी (दि.४) गटशिक्षणाधिकारी स्नेहल रामटेके व केंद्रप्रमुख यू. पी. बिसेन यांनी आकस्मिक भेट दिली.

गटशिक्षणाधिकाऱ्यांची ही प्रथम भेट असल्याने शाळेतर्फे त्यांचे उत्साहपूर्ण स्वागत करण्यात आले व शाळेबद्दल माहिती देण्यात आली. उन्हाळी सुट्टीत वर्ग सुरू असल्यामुळे विद्यार्थी व शिक्षकांचे कौतुक केले. तसेच विद्यार्थ्यांच्या तयारीचा आढावा घेतला.

विद्यार्थ्यांसोबत संवाद साधून योग, खेळ कशाप्रकारे घेतले जातात हे जाणून घेतले. तसेच इंग्लिश-मराठी शब्दांचे श्रुतलेखन घेतले. शिवाय, शाळेची गुणवत्ता, पालक सहभाग, सर्व शिक्षकांचे नियोजन आपुलकीने जाणून घेतले. तसेच नव्याने प्रवेशित बालकांच्या घरी जाऊन पालकांशी हितगुज करून स्वागत केले. यावेळी मुख्याध्यापक एस. सी. कोठे यांच्यासह सर्व शिक्षक तसेच स्वयंसेविका सरिता पारधी उपस्थित होत्या.

# नगरपरिषदेच्या विरोधात आंदोलनाचा इशारा

**आमगाव :** स्थानिक नगरपरिषदेअंतर्गत रिसामा येथील रेल्वे स्टेशनपासून ते माता मंदिर ते परमाका एजन्सीपर्यंत संपूर्ण रस्ता व नाली जीर्ण झाली आहे. हा रस्ता हा गोरठा जाण्यासाठी जवळ पडतो. परिणामी या मार्गावर सर्वाधिक वर्दळ असते. पण, हा रस्ता व नालीची अद्यापही दुरुस्ती करण्यात आली नाही. त्यामुळे या मार्गावरील अपघातांच्या संख्येत वाढ झाली आहे. पण, नगर परिषदेने याची अद्यापही दखल घेतली नाही. त्यामुळे या विरोधात जनआंदोलन छेडण्याचा इशारा रिसामावासीयांनी दिला आहे.

नाल्यांमधील गाळाचा उपसा न केल्याने व नाल्यांचे बांधकाम न केल्याने घाणीचे साम्राज्य निर्माण झाले असून यामुळे रिसामावासीयांचे आरोग्य धोक्यात आहे. याची सूचना तक्रार नगर परिषदेकडे केली, पण त्यांनी याची अद्यापही दखल घेतली नाही. नगरपरिषदेमध्ये समावेश असलेल्या आठ गावांमध्ये कुठलीच कामे केली जात नसल्याचे चित्र आहे. नगर परिषद मुख्याधिकारीसुद्धा याची दखल घेत नसल्याने रिसामावासीयांनी त्रस्त होऊन २ जून रोजी खा. नामदेव किरसान यांना निवेदन देऊन याकडे लक्ष वेधले. ११ जूनपर्यंत रिसामा येथील रस्ते व नाली याकडे लक्ष दिले नाही तर रिसामावासीयांद्वारे १२ जूनला जनआंदोलन छेडण्याचा इशारा महेश उके, तिलकचंद तरोणे यांनी दिला आहे.



# पर्यटन संकुल परिसरात स्वच्छता अभियान व वृक्षारोपण



**नवेगावबांध :** नवेगाव राष्ट्रीय उद्यान वनपरिक्षेत्रात ५ जून रोजी जागतिक पर्यावरण दिवस विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला वन्यजीव विभागाच्या नवेगाव राष्ट्रीय उद्यान, स्वागत, विशेष व्याघ्र संरक्षण दल, नवेगाव प्रादेशिक वन विभाग व नवेगाव आगार येथील वनाधिकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यानिमित्ताने व्याघ्र प्रकल्पातील प्राथमिक प्रतिसाद दलाच्या संचालिका दामिनी भगत यांनी उपस्थितांना पर्यावरणाचे महत्व समजावून सांगून, त्याची जोपासना करण्याबाबत शपथ सर्वांना दिली. त्यानंतर नवेगावबांध तलाव तसेच स्वागत संकुल परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आला. त्यानंतर परिसरात वृक्षारोपण करून कार्यक्रमाचा समारोप झाला. नवेगावचे निसर्ग मार्गदर्शक, जिप्सी चालक तसेच नवेगावबांध येथे भेट देणाऱ्या पर्यटकांनी देखील पर्यावरण कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेतला. नवेगाव राष्ट्रीय उद्यानाच्या वनपरिक्षेत्र अधिकारी प्रतिभा रामटेके, स्वागताधिकारी वनपरिक्षेत्र अधिकारी प्रमोद पझारे यांनी सर्व उपस्थितांना पर्यावरणाच्या महत्त्वा विषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी लेखापाल जगदीश होले, वनरक्षक अरविंद बडगे यांचेसह सर्व वनपाल वनरक्षक वनमजूर यांनी सहकार्य केले. पर्यावरण कार्यक्रमाला वन्यजीव वनविभाग चे सर्व अधिकारी व कर्मचारी तसेच पर्यटक बहुसंख्येने उपस्थित होते.

# टार्गेट पूर्ण झालेल्या गुरुजींच्या गळ्यात पडणार सत्काराची शाल

## 25 टक्के पटसंख्या वाढीचे उद्दिष्ट ; 23 जूनपासून होणार शाळा सुरू

गोंदिया : जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिका, अनुदानित खासगी शाळा येत्या २३ जूनपासून सुरू होणार आहेत. पटसंख्या कमी असलेल्या शाळेतील शिक्षकांनी उन्हाळ्याच्या सुटीत गाव भमंती करून विद्यार्थ्यांचा शोध घेतला. आता शासनाकडून जिल्हा परिषद शाळेतील पटसंख्या वाढविण्याचे निर्देश आले आहेत. २५ टक्के पटसंख्या वाढीचे उद्दिष्ट गुरुजींनी पूर्ण केल्यास त्यांच्या गळ्यात सत्काराची शाल पडणार आहे.

जिल्हा परिषद शाळांची पटसंख्या कमालीची घटत चालली आहे. त्याचा परिणाम म्हणून शिक्षकांवर अतिरिक्त ठरण्याची वेळ आली आहे. पालकांचा ओढा हा खासगी इंग्रजी माध्यमांच्या शाळांकडे वाढत चालला आहे. जिल्हा परिषद शाळेतून काढून पालक आपल्या पाल्यांना खासगी इंग्रजी माध्यमाच्या शाळेत टाकत आहे. तो स्पर्धेच्या युगात टिकावा, यासाठी सर्व खटाटोप सुरू केला जात आहे. जिल्हा परिषद शाळेतील पटसंख्या वाढावी याची जबाबदारी आता गुरुजींच्या खांद्यावर देण्यात आली आहे. त्यासाठी गृहभेटी देऊन सर्वेक्षण करण्यात येत आहे. पालकांचे मतपरिवर्तन करताना मुलांसाठीच्या योजना, उपक्रम, शैक्षणिक दर्जा, नवीन शैक्षणिक धोरण आदीबाबत माहिती दिली जात आहे. पालकांकडून टीसी देण्याचे चेहऱ्यावर हास्य उमलत आहे.



### जिल्हा परिषद शाळांचे रूप पालटतेय

राज्य शासनामार्फत जिल्हा परिषदेच्या शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना अनेक सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. यामध्ये मोफत पाठपुस्तके, शालेय गणवेश, बूट, पायमोजे, पोषण आहार, शिष्यवृत्ती यासारखे अनेक उपक्रम राबविले जात असून डिजिटल वर्गखोल्या, संगणकीय लॅब आदी सुविधांचाही समावेश आहे.

## रासायनिक शेतीपेक्षा सेंद्रीय शेती फायदेशिर

**गोंदिया :** सेंद्रिय शेती करणे ही आजची काळाची गरज बनली आहे. शेतीमध्ये अधिक उत्पादन मिळावे म्हणून रासायनिक खतांचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. रासायनिक खतांच्या अति जास्त वापरामुळे जमिनीची पोत दिवसेंदिवस खालावत चालली आहे. शिवाय रासायनिक खतांचे दुष्परिणाम मानवी शरीरावर जाणवत आहेत. अशा स्थितीत जमिनीची पोत सुधारण्यासाठी आणि अधिक उत्पादन घेण्यासाठी सेंद्रिय शेती करणे हे अधिक फायदेशीर ठरणार आहे.

## हवामानाचा अचूक अंदाज आता मोबाइलवर

**गोंदिया :** शेती हा निसर्गावर अवलंबून असलेला व्यवसाय आहे. वेळेवर पाऊस न पडणे, अतिवृष्टी, गारपीट यामुळे अनेकदा शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होते. मात्र, आता आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने हवामानाचा अचूक अंदाज मिळवणे शक्य झाले आहे.

# निगेटिव्ह रक्त देवून ६ वर्षीय चिमुकल्याची मदत




**गोंदिया :** गोंदिया येथील पूर्वांश कुलदीप पारधी या ६ वर्षीय चिमुकल्याची प्रकृती अचानक बिघडल्यामुळे त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. डॉक्टरांनी त्याना निगेटिव्ह रक्ताची गरज असल्याचे सांगितले. यावर सविता चौहान यांनी रक्तमित्र गुड्डू चांदवानी यांच्याशी संपर्क केला. चांदवानी यांनी त्वरित रक्तमित्रांशी संपर्क साधला. व निगेटिव्ह रक्त असलेले रवि कुंदनानी यांनी रक्तदान करून त्या चिमुकल्याला मदत केली. या कामगिरीमुळे कुंदनानी यांचे प्रमाणपत्र देवून सत्कार करण्यात आला.

पूर्वांश कुलदीप पारधी (०६) याची प्रकृती बिघडल्याने त्याला रूग्णालयात दाखल करण्यात आले. तपासणीदरम्यान त्याच्या शरीरात रक्ताची तीव्र कमतरता आढळली आणि त्याला निगेटिव्ह या अत्यंत दुर्मिळ रक्तगटाच्या तात्काळ गरजेची माहिती मिळाली. हा रक्तगट हजारो व्यक्तींमध्ये केवळ एखाद्याजवळच आढळतो, त्यामुळे कुटुंबीय अत्यंत चिंतेत होते. याची माहिती सविता चौहान यांनी रक्तमित्र विनोद चांदवानी (गुड्डू) यांना दिली. त्यांनी तात्काळ आपल्या नियमित निगेटिव्ह रक्तदात्यांच्या यादीतील संपर्कांना सक्रिय करून व्यवसायिक रवि कुंदनानी यांना या गंभीर परिस्थितीची कल्पना दिली. रवि कुंदनानी यांनी विलंब न करता लोकमान्य ब्लड बँकेत जाऊन निगेटिव्ह रक्तदान केले आणि एका चिमुकल्याचे प्राण वाचवून मानवतेचे उदाहरण जगासमोर सादर केले. या स्तुत्य कार्याबद्दल विनोद चांदवानी (गुड्डू), बालकाचे वडील कुलदीप पारधी, नितीन रायकवार, अमीषा कटरे, आंचल मेश्राम यांच्या हस्ते रवि कुंदनानी यांचा प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

### रक्तदाते कुंदनानी यांचा सत्कार

# पावसाने मारली दडी अन् पाऱ्याने घेतली उडी

## नवतपा सुरू असल्याचा अनुभव ; उकाड्याने जिल्हावासीय झाले हैराण

गोंदिया : हवामान खात्याकडून दररोज 'यलो अलर्ट' देत पावसाचा अंदाज वर्तविला जात असला, तरी वास्तविक पाऊस काही बरसत नसल्याची स्थिती आहे. यावरून हवामान खात्याचा अंदाज चुकत असून, पावसाने दडी मारताच पाऱ्याने उडी मारली असून, तापमान ३७.८ अंशावर पोहोचले आहे. परिणामी, उकाड्याने जिल्हावासीय हैराण झाले असून, नवतपा सुरू असल्याचा अनुभव येत आहे. पाऊस बरसून कधी उकाड्यापासून सुटका मिळवून देतो, यासाठी सर्वांच्या नजरा आता आकाशाकडे लागून आहेत.

यंदा पाऊस लवकर येणार, असे हवामान खात्याकडून सांगितले जात होते. मात्र, मे महिन्यातील दुसऱ्या पंधरवड्यापासून अवकाळी पावसाचा काही प्रमाणात जिल्ह्यात कहर दिसून आला. राज्यातील अन्य जिल्ह्यांमध्ये अवकाळीने नाकीनऊ आणले असतानाच जिल्ह्यात मात्र पावसाचा तेवढा जोर दिसून आला नाही. काही भागात पावसाने दमदार हजेरी लावून काही प्रमाणात नासाडी केली. मात्र, या व्यतिरिक्त पावसाने जास्त जोर दाखवला नाही. आता तर मागील आठवडाभरापासून पावसाने दडी मारली असून, परिणामी पारा चांगलाच चढला आहे.


ढगाळ वातावरण व पावसामुळे ३२ अंशावर आलेला पारा आता मागील काही दिवसांपासून थेट ३७ अंश पार करून गेला आहे. तर किमान तापमानातही वाढ होत असून, ते २६ अंशावर गेल्याने दिवसा तसेच रात्रीही उकाड्यामुळे अंगाची लाहीलाही होत आहे.



# पाणीपुरवठ्याला बसतोय वीजपुरवठ्याचा 'शॉक'

## वीजपुरवठ्यामुळे पाणीपुरवठा खंडित ; मजिप्रापुढे एक ना एक समस्या

**गोंदिया :** वैनगंगा नदीने साथ सोडल्यामुळे निर्माण झालेल्या पाणीपुरवठ्याच्या समस्येवर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणने पुजारीटोला प्रकल्पातून पाणी आणून तोडगा काढला. आता नदीत भरपूर पाणीसाठा झालेला असतानाच वीजपुरवठ्याचा प्रश्न वारंवार निर्माण होत आहे. वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्यामुळे पाणीपुरवठा खंडित होत आहे. मजिप्रा पुढे एक ना एक समस्या उभ्या राहत असून, पाणीपुरवठ्याला आता वीजपुरवठ्याचा 'शॉक' बसत आहे.



यंदा ऐन एप्रिल महिन्यातच वैनगंगा नदी कोरडी पडल्याने गोंदिया शहरासह लगतच्या ग्राम कुडवा व कटंगीला पाणीपुरवठा करण्याचा प्रश्न निर्माण झाला होता. अशात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणने पुजारीटोला प्रकल्पातून पाणी मागवून नदीत सोडले व त्यानंतर आता कुठे पाण्याची समस्या सुटली आहे. सध्या नदीला चांगलाच पाणीसाठा असून, पाण्याची कमतरता पडणार नाही अशी स्थिती आहे. मात्र, पाणीपुरवठा करण्यासाठी वीजपुरवठ्याची गरज पडत असून, वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्यामुळे पाणीपुरवठा खंडित होत आहे.

एक दिवस पाणी आले नाही तर शहरासह ग्रामीण भागातही पाण्यासाठी हाहाकार माजू लागतो, अशी स्थिती निर्माण झाली आहे. मात्र, वीजपुरवठा खंडित झाल्यास त्यावर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या हाती काहीच राहत नसल्याने पाणीपुरवठा खंडित होतो. नदीतील पाण्याची समस्या सुटली असतानाच आता वीजपुरवठ्याची समस्या निर्माण होत असल्याने पाणीपुरवठ्याची समस्या अचानकच उभी होते.

: आरएनआय रजिस्ट्रेशन क्रमांक :
No-MAHMAR 2011/40516
महासागर गोंदिया
मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर-१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय : शुभमंगल कार्यालय, एलआयसी ऑफीसजवळ, गणेशनगर, गोंदिया येथून प्रकाशित केले. संपादक-श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन-०७१२-२७६७२८, ९३७३११७०४२ स्थानिक संपादक : जयंत मदनलाल शुक्ला, फोन ९८२२३८६९९९ (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील)

